आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ नोव्हेंबर २०२४ – गुरुवार

- अदानी लाचखोरी प्रकरण आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- राज्यातल्या सरकारस्थापनेविषयी आज नवी दिल्लीत भाजपा पक्ष श्रेष्ठींसमवेत महायुतीच्या घटक पक्षांची बैठक
- झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून हेमंत सोरेन चौथ्यांदा घेणार शपथ
- महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथिनिमित्त आदरांजली
- सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे पी.व्ही सिंधूसह ४ खेळाडू उपान्त्यपूर्व फेरीत दाखल

<u>संसद/पूल/कौस्तुभ</u>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनातल्या आजच्या तिसऱ्या दिवशी विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज  सुरू झाल्यावर अदानी लाचखोरी प्रकरणासह इतर मुद्यांवरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केला. सभागृहाच्या हौद्यात उतरून सदस्यांनी घोषणाबाजी केली. विरोधी पक्ष देशाच्या हिताशी संबंधित नसलेले मुद्दे उचलत आहे, असं म्हणत लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी घोषणाबाजी करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या जागेवर परतायला सांगितलं, आणि प्रश्नोत्तराचा तास पुकारला.  मात्र गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी अदानी समूह लाचखोरी प्रकरणी चर्चा करण्याची विनंती केली. मात्र, राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला.

दरम्यान, वक्फ सुधारणा विधेयक २०२४ वरचा अहवाल सादर करण्याची मुदत २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी ठेवला होता, ते सभागृहानं संमत केला.

**PAR-JOSHI+CONGRESS - PARLIAMENT/ पूल / कौस्तुभ+ गौरी**

विरोधी पक्षांनी संसदेत गदारोळ केल्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी टीका केली आहे. लोकसभा सभापती आणि राज्यसभा अध्यक्ष यांनी परवानगी दिलेल्या विषयावर चर्चा करायला सरकार तयार आहे, असं त्यांनी संसदेच्या आवारात वार्ताहरांना सांगितलं.

संसदेमधे सरकारी कामकाजाबरोबरच जनतेशी संबंधित विविध मुद्यांवर चर्चा होणं अपेक्षित आहे असं काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी म्हटलं आहे. संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. लोकशाहीचा अर्थ सर्वांना सोबत घेणे असा असल्याचं ते म्हणाले.

शपथ ग्रहण/हिंस/नेहा

केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा यांनी आज लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. तसंच नांदेड लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार रविंद्र चव्हाण यांनी लोकसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. चव्हाण यांनी मराठीतून शपथ घेतली.

लोकसभा-वैमानिक/पूल/नेहा

गेल्या ३ वर्षांत ९७० महिलांना व्यावसायिक वैमानिक परवाने देण्यात आल्याचं सरकारनं म्हटलं आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. विविध विमान कंपन्यांमध्ये एकूण ११ हजार ७७५ वैमानिक कार्यरत असून त्यापैकी १५ टक्के म्हणजे १ हजार ७६७ महिला आहेत असल्याचं त्यांनी सांगितलं.

विश्वकर्मा/पूल/रश्मी

पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत सुमारे २५ लाख लाभार्थी नोंदणीकृत असल्याची माहिती सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री शोभा करंदालजे यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली. या योजनेसाठी सप्टेंबर २०२३ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत २ हजार १२२ कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे, असंही त्या म्हणाल्या.

महाराष्ट्र सत्तास्थापना/ रिडे+ डेस्क / गौरी

महाराष्ट्रात सरकरस्थापना आणि मुख्यमंत्री कोण होणार याविषयी निर्णय घेण्यासंदर्भात महायुतीच्या घटक पक्षांच्या नेत्यांची आज नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर संयुक्त बैठक होणार असून त्यानंतर सरकार स्थापनेबद्दल चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान भाजपचं वरिष्ठ नेतृत्व, अर्थात, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतील, तो आपल्याला पूर्णपणे मान्य असेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केलं. सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या आमदारांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते गृहमंत्री अमित शहा यांची काल नवी दिल्लीत भेट घेतली. मात्र या बैठकीत सत्ता स्थापनेबाबत चर्चा झाली नसल्याचं शिवसेनेचे नेते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितलं.

पक्षश्रेष्ठींसोबत चर्चेद्वारे सर्व निर्णय घेतले जातील असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात प्रसारमाध्यमांना सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवारही दिल्लीत दाखल झाले असून सत्ता स्थापनेबद्दल खेळीमेळीनं निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली.

<u>सोरेनशपथविधी/ पूल / गौरी</u>

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते, हेमंत सोरेन आज झारखंडचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री म्हणून चौथ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. राज्यपाल संतोष कुमार गंगवार, आज संध्याकाळी रांची इथे होणाऱ्या शपथविधी समारंभात सोरेन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. काँग्रेस अध्यक्ष मलिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह मेघालय, पंजाब आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री यांना देखील या समारंभाचं आमंत्रण आहे.

शपथविधीसाठी जय्यत तयारी करण्यात आली असून रांची शहरातल्या शाळा आज बंद आहेत.

**<u>GOYAL - PRESS CONFERENCE/ पूल / गौरी</u>**

सर्वच क्षेत्रातल्या  चौफेर प्रगतीमुळे भारत आंतरराष्ट्रीय व्यापार, संशोधन आणि गुंतवणुकीसाठी जागतिक पातळीवर आकर्षण ठरला असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आज ते पत्रकारपरिषदेत बोलत होते. डिजिटल भारत अभियानामुळे देशात क्रांती घडली असून भारत विदा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तत्संबंधी संशोधनाचं केंद्र बनला आहे असं ते म्हणाले.

अमेरिका आणि युकेमधल्या घडामोडींचा परिणाम भारताच्या या देशांबरोबरच्या व्यापारी संबंधांवर होणार नाही असं सांगून ते म्हणाले की संसदेचं हिवाळी अधिवेशन संपल्यावर युके बरोबर मुक्त व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरु होतील.

<u>फुले पुण्यतिथी/ डोस्क/ गौरी</u>

महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथिनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जोतिबा फुले यांना आदरांजली वाहणारे संदेश समाजमाध्यमावर लिहीले आहेत. जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचार - कार्यावर आधारित विविध कार्यक्रम विविध संस्था संघटनांतर्फे राज्यात सर्वत्र होत आहेत.

<u>सैद मोदी बॅडमिंटन/पूल/रश्मी</u>

लखनौ इथे सुरू असलेल्या सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरी गटात भारताच्या पी. व्ही. सिंधूने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने भारताच्या इरा शर्मा हिचा २१-१०, १२-२१, २१-१५ असा पराभव केला. याच प्रकाराच्या दुसऱ्या सामन्यात भारताच्या उन्नती हुडा हिने पोर्नपिचा चोईकीवोंग हिचा २१-१८, २२-२० असा सरळ गेममध्ये पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

या स्पर्धेच्या पुरुष एकेरी प्रकारात भारताच्या मीराबा लुवांग मैसराम आणि आयुष शेट्टी यांनीही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. मीराबा याने सहाव्या मानांकित आयर्लंडच्या नट गुयेन याचा २१-१५, २१-१३ असा पराभव केला. तर आयुष याने मलेशियाच्या जस्टिन होह याला २१-१२, २१-१९ असं नमवलं. दरम्यान, आज भारताचा लक्ष्य सेन हा इस्रायलच्या डॅनिल डुबोवेंको याच्याविरुद्ध खेळणार आहे.

भंडारा धान विक्री - हिंस - राजेश

भंडारा जिल्ह्यातल्या शासनाच्या धान खरेदी पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना धान विक्री करता यावी यासाठी जिल्ह्यात १९० खरेदी केंद्रं सुरु करण्यात आली आहेत. या हंगामाकरत धानची आधारभूत किंमत २३०० रुपये प्रतिक्विंटल असून शेतकऱ्यांनी जवळच्या केंद्रावर धान विक्री करुन आधारभूत किंमतीचा लाभ घ्यावा असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

नंदूरबार रुग्णवाहिका/पीटीसी/रश्मी

राज्य शासनाने नंदुरबार जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला ३३ नव्या रुग्णवाहिका दिल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातून रुग्णांची वाहतूक करणं शक्य होणार आहे. या ३३ पैकी अक्कलकुवा आणि शहादा या तालुक्यांना प्रत्येकी ९, तर धडगाव, नंदूरबार आणि नवापूर या तालुक्यांना प्रत्येकी ४ आणि तळोदा तालुक्याला २ रुग्णवाहिका दिल्या जाणार आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे. यासोबत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने अक्कलकुवा आणि धडगाव या तालुक्यांसाठी आणखी २६ रुग्णवाहिकांची मागणी केली आहे.

कोल्हापूर अपघात - हिंस - राजेश

कोल्हापूर जिल्ह्यात उदगाव इथं आज सकाळी कोल्हापूर सांगली महामार्गावर एक कार कृष्णा नदीत कोसळून झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात एका दांपत्याचा समावेश असून अन्य तीन जण जखमी झाले आहेत.

ठळक बातम्या पुन्हा एकदा

- अदानी लाचखोरी प्रकरण आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- राज्यातल्या सरकारस्थापनेविषयी आज नवी दिल्लीत भाजपा पक्ष श्रेष्ठींसमवेत महायुतीच्या घटक पक्षांची बैठक
- झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून हेमंत सोरेन चौथ्यांदा घेणार शपथ

- महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथिनिमित्त आदरांजली

- सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे पी.व्ही सिंधूसह ४ खेळाडू उपान्त्यपूर्व फेरीत दाखल

<u>जपान अर्थमंत्री - पुल - राजेश</u>

अशियाई विकास बँकेचे ११ वे अध्यक्ष म्हणून जपानचे अर्थमंत्री मसातो कानदा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांची निवड करण्यात आली. ते पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात पदभार स्वीकारतील असंही बँकेच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. मसातो कानदा हे जपानच्या प्रधानमंत्र्यांचे विशेष आर्थिक सल्लागारही आहेत.

<u>रोजगार /पुल /कौस्तुभ</u>

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत येणाऱ्या आरोग्य सुविधांचा समावेश राज्य कर्मचारी विमा महामंडळाच्या सुरक्षा कवचात करून याची व्याप्ती वाढवण्यात येणार असल्याचं कामगार आणि रोजगार मंत्रालयाने आज आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या योजनेचा लाभ १४ कोटींपेक्षा जास्त लाभार्थ्यांना होईल, देशभरातल्या कर्मचाऱ्यांना चांगली आरोग्य सुविधा मिळेल, तसंच प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत जोडलेल्या देशभरातल्या तीस हजारपेक्षा जास्त रुग्णालयांमधल्या सेवांचा लाभही त्यांना मिळेल असं या पत्रकात म्हटलं आहे. उपचार खर्चावर कोणतीही मर्यादा नसेल, तसंच देशातल्या धर्मादाय रुग्णालयांमध्येही या योजनेच्या लाभार्थ्यांना सेवा देण्यात येईल, असंही यात सांगण्यात आलं आहे.

<u>प्रधानमंत्री धमकी/हिंस/नेहा</u>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या महिलेला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आरोपी महिलेची चौकशी करण्यात येत आहे. याप्रकरणी प्रधानमंत्री कार्यालयाला माहिती देण्यात आली आहे.

<u>**HOCKEY-JN ASIA CUP / पूल / गौरी**</u>

पुरुष कनिष्ठ गट हॉकी आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे. ओमानमधे मस्कत इथं ही स्पर्धा सुरु आहे. येत्या शनिवारी भारताचा मुकाबला चिनी तैपेई बरोबर तर रविवारी कोरिया बरोबर होईल.

<u>चक्रीवादळ/ पुराबा</u>

नैऋत्य बंगालच्या उपसागरात, श्रीलंकेच्या उत्तर किनाऱ्याजवळ कमी दाबाचा पट्टा तयार झाला असल्यामुळे येत्या शनिवारपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेशच्या किनारी भागात अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या कमी दाबाच्या पट्टयाचं चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता असल्याचं हवामान खात्याचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितलं. हे चक्रीवादळ शनिवारी सकाळच्या सुमारास उत्तर तामिळनाडू किनारपट्टीजवळ पोहोचेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

<u>अमरावती अपघात - हिंस - राजेश</u>

अमरावती जिल्ह्यात मोर्शी वरुड मार्गावर एक ट्रक आणि पिकअपच्या धडकेत तिघांचा मृत्यू झाला. लाखारा फाट्यानजिक झालेल्या या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू झाला असून इतर सहा जण जखमी झाले आहेत. या अपघातामुळे जिल्ह्यातील अवैध वाहतूकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जखमींवर वरुड इथल्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.